लोकमत | पुणे, सोमवार ३१ जानेवारी २०११

# कचरा वेचणाऱ्यांचा सन्मान मोर्चा



कचरा वेचणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत नॅशनल सोसायटी फॉर क्लिन सिटीजच्या सभासदांनी केलेल्या उपहासात्मक विधानांचा निषेध कागद, काच, पत्रा, कष्टकरी पंचायत आणि स्वच्छ या संस्थांनी सन्मान मोर्चा काढून केला. यामध्ये वनराईचे अध्यक्ष मोहन धारिया आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव सहभागी झाले होते.

**पुणे, दि. ३० (प्रतिनिधी) :** शहरातील कचरा वेचणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत नॅशनल सोसायटी फॉर क्लिन सिटीजच्या (एनएससीसी) सभासदांनी केलेल्या उपहासात्मक विधानांचा निषेध कागद, काच, पत्रा, कष्टकरी पंचायत आणि स्वच्छ या संस्थांनी सन्मान मोर्चा काढून केला. कचरा कर्मचाऱ्यांना सन्मानाने वागवा, अशीच मागणी या मोर्चाद्वारे करण्यात आली.

नॅशनल सोसायटी फॉर क्लीन सिटीजच्या सभासदांनी कचरा वेचणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत काही आक्षेपार्ह विधाने केली होती. या पार्श्वभूमीवर कागद, काच, पत्रा, कष्टकरी पंचायत आणि स्वच्छ या संघटनांमार्फत सन्मान मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव आणि ज्येष्ठ पर्यावरणवादी मोहन धारिया या आंदोलनाला उपस्थित होते. महापालिकेजवळील महात्मा फुले पुतळ्यापासून या मोर्चाला प्रारंभ झाला. यावेळी कष्टकरी, कचरा वेचणाऱ्या महिला, पुरुष कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोर्चाचे पुणे स्टेशन येथील गांधी पुतळ्याजवळ सभेत रूपांतर झाले.

धारिया म्हणाले की, शहर स्वच्छ करण्याची जबाबदारी स्वतःहून हे कर्मचारी उचलतात. त्यांना मोबदलाही मोठ्या प्रमाणावर मिळत नाही. मुख्यमंत्र्यांच्या वेतनाएवढेच प्रत्येक कर्मचाऱ्याला वेतन मिळाले पाहिजेत. कचरा वेचताना सापडलेले मौल्यवान दागिने, कागदपत्रे, पैसे आम्ही प्रामाणिकपणे परत करतो, मग आम्हाला चोर का ठरविले जाते, असा प्रश्न या वेळी काही महिला कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला. शहरातील कचरा उचलण्याचे काम बंद केले तर शहराची अवस्था काय होईल, याचा विचार पुणेकरांनी करावा, असे या वेळी मोलकरीण संघटनेच्या अध्यक्षा श्रद्धा वाडेकर यांनी सांगितले. बाबा आढाव म्हणाले की, दुसऱ्यावर आरोप करणाऱ्या वृत्तीविरोधातील ही लढाई आहे. ही वृत्ती बदलण्याची आवश्यकता आहे. कचरा वेचणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही सन्मानाने वागविले पाहिजे.